दिनांक 12/12/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.197

विषय – विटा नगरपरिषद हद्दीतील सॅनटरी नॅपकीन, हगीझ यांची विल्हेवाट लावणेसाठी इंसिनरेशन मशीन खरेदी करणे,बसवून देणे, कार्यान्वयीन करून देणे व इतर अनुषंगीक कामे करणेकामी दाखल ई निविदावर निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी भांडार विभाग प्रमुख यांची दिनांक 11/12/2023 रोजी मंजूर केलेली टिपणी

विटा नगरपरिषद हद्दीतील सॅनटरी नॅपकीन, हगीझ यांची विल्हेवाट लावणेसाठी इंसिनरेशन मशीन खरेदी करणे,बसवून देणे, कार्यान्वयीन करून देणे व इतर अनुषंगीक कामे करणेकामी ॲप खरेदी करणेबाबत खालील ई निविदा दाखल आहेत.

| | |
|---|---|
| 1) वैभव निळकंठ घेवरी | र.रू.30,38,500/- |
| 2) इलेक्ट्रो ड्रिम्स टेक. इंडिया | र.रू.29,50,000/- |
| 3) बी.एल.पाटील ॲण्ड सन्स एंटरप्रायजेस | र.रू.30,09,000/- |

उपरोक्त ई निविदापैकी इलेक्ट्रो ड्रिम्स टेक. इंडिया यांचे निविदेतील दर सर्वात कमी आहेत. नगरपरिषदेच्या आर्थिक फायदयाचा विचार करता सदर कामास तांत्रिक मान्यता र.रू.25,68,252/- इतक्या रक्कमेस मान्यता मिळाली असलेने त्या रक्कमेच्या मर्यादेत काम करणे अपेक्षित आहे.याबाबत सदर मक्तेदारास वाटाघाटीसाठी लेखी पत्र दिले असता त्यानी सदरचे काम तांत्रिक मान्यता असलेल्या रक्कमेस करणेस तयार असलेबाबत लेखी पत्र दिले आहे. तरी महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2013 मधील तरतूदीनूसार सर्वात कमी दराचे निविदाधारक इलेक्ट्रो ड्रिम्स टेक. इंडिया यांची तात्रिक मान्यतेप्रमाणे र.रू.25,68,252/- इतक्या रक्कमेची निविदा मंजूर करीत आहे. याकामी रितसर करारपत्र करून कार्यारंभ आदेश देणेत यावा. तसेच नामंजूर टेंडर बयाणा रक्कम अदा करणेस मंजूरी देत आहे.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 12/12/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.198

विषय – सन 2023-24 या वित्तीय वर्षाकरीता पाणी पुरवठा विभागाकडील आळसंद घोगांव येथील विदयुत उपकरणे दुरूस्त करणेकामी दाखल ई निविदावर निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी विभाग प्रमुख यांची दिनांक 11/12/2023 रोजी मंजूर केलेली टिपणी

सन 2023-24 या वित्तीय वर्षाकरीता पाणी पुरवठा विभागाकडील आळसंद घोगांव येथील विदयुत उपकरणे दुरूस्त करणेकामी खालील ई निविदा दाखल आहेत.

1) मलिक इलेक्ट्रिकल्स
2) स्टेशनरी बॅटरी सर्व्हिस सेंटर
3) इप्सित इंटरप्राईजेस

उपरोक्त ई निविदापैकी मलिक इलेक्ट्रिकल्स यांचे निविदेतील दर सर्व प्रकारात सर्वात कमी आहेत. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2013 मधील तरतूदीनूसार सर्वात कमी दराची निविदा मंजूर करीत आहे. याकामी रितसर करारपत्र करून कार्यारंभ आदेश देणेत यावा. तसेच नामंजूर टेंडर बयाणा रक्कम अदा करणेस मंजूरी देत आहे.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 12/12/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.199

विषय – नगरपरिषद हद्दीतील जाहिरात प्रदर्शित करण्याचे नियमन व नियंत्रण करण्यासाठी शहरस्तरीय नियंत्रण समिती स्थापन करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- 1) मा.मुख्याधिकारी यांनी अतिक्रमण विभाग प्रमुख यांची दिनांक 11/12/2023 रोजी मंजूर केलेली टिपणी

2) जनहित याचिका क्र.155/2011 मधील दि.31/01/2017 चे मा. उच्च न्यायालयाचे आदेश.

3) मा. सह आयुक्त, नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांचे पत्र नपप्रसं:परिपत्रक/जनहित याचिका 155/2011/अनाधिकृत होडींग्ज/का-6/2022/3609,दि 18/08/2022.

4) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 मधील कलम 196 मधील तरतुदी.

वरील संदर्भीय विषयानुसार अनाधिकृत जाहिराती, घोषणा फलक, होर्डिंग, पोस्टर्स बाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिका क्रमांक 155/2011 मे. सुस्वराज्य फाउंडेशन, सातारा आणि इतर विरुद्ध महाराष्ट्र शासन व इतर, तसेच सु मोटो अवमान याचिका क्र.11/2016 या याचिकेवरील सुनावणी मध्ये मा. उच्च न्यायालयाने दिनांक 31/01/2017 रोजी विस्तृत निकाल दिलेला आहे.

सदर निकाल देतेवेळी मा.उच्च न्यायालयाने अनधिकृत जाहिराती, घोषणा फलक, होर्डिंग, पोस्टर्स यांवर कारवाई करण्याच्या दृष्टिकोनातून तसेच अनाधिकृत जाहिरातींवर प्रतिबंध होण्याच्या दृष्टिकोनातून सदर याचिकेवर निर्णय देताना सविस्तर निर्देश दिलेले आहेत.

त्या अनुषंगाने शहरातील विना परवानगी लावण्यात येणारे बॅनर्स, पोस्टर्स, होर्डींग्स, फ्लेक्स यांवर नियमन व नियंत्रण करण्यासाठी शहरस्तरीय नियंत्रण समिती स्थापन करणे आवश्यक आहे. या समिती मार्फत शहरात व्यापक जनजागृती कार्यक्रम हाती घेणे व अनाधिकृत बॅनर्स, पोस्टर्स, होर्डींग्स, फ्लेक्स याबाबत सतर्क राहून नोडल अधिकारी यांचे निदर्शनास आणून देणे अभिप्रेत आहे.

तरी याकामी खालीप्रमाणे समिती स्थापन करणेत येत आहे.

| अ.क्र. | नांव | पदनाम/हुद्दा | समितीमधील पद |
|---|---|---|---|
| 1 | डॉ.श्री.विक्रम बांदल | प्रशासक,न.प.विटा. | अध्यक्ष |
| 2 | श्री.विक्रमसिंह पाटील | मुख्याधिकारी, न.प.विटा. | सदस्य सचिव |
| 3 | श्री.स्वप्निल खामकर | उपमुख्याधिकारी, न.प.विटा | सदस्य |
| 4 | श्री.विशाल येळेकर | पोलीस उपनिरीक्षक,पो.ठाणे,विटा | सदस्य |
| 5 | श्री.अजित पाटील | नगर अभियंता | सदस्य |
| 6 | श्री.नारायण शितोळे | आरोग्य निरीक्षक | सदस्य |

पान नं 2 वर

| | | | |
|---|---|---|---|
| 7 | श्री.आनंदा सावंत | अतिक्रमण विभागप्रमुख | सदस्य |
| 8 | श्री.विजय पाटील | अध्यक्ष - केमिस्ट असोसिएशन | सदस्य |
| 9 | श्री.पांडुरंग डोंबे | अध्यक्ष - किराणा असोसिएशन | सदस्य |
| 10 | श्री.राजेंद्र शितोळे | अध्यक्ष - सराफ असोसिएशन | सदस्य |
| 11 | श्री.संजय भस्मे | अध्यक्ष - कापड असोसिएशन | सदस्य |
| 12 | श्री.स्वरूप पुणेकर | अध्यक्ष - मंडप असोसिएशन | सदस्य |

सदर समिती गठीत केलेची माहिती नागरिकांना होण्यास्तव जाहीर प्रसिद्धी देणेत यावी. तसेच नगरपरिषदेच्या टोल फ्री क्रमांक किंवा सदर समिती कडे उपरोक्त संदर्भात तक्रारी प्राप्त झाल्यास नोडल अधिकारी यांनी त्यांचे तातडीने निराकरण करणेत यावे. तरी सदर समिती स्थापन करणेस मान्यता देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा